<u>नियमित दिवाणी दावा क्र.२८४/२०१३ मधील निशाणी ७८ व ८३ वरील एकत्रीत आदेश</u>

<u>(मालन घाडगे वि. भैराप्पा जावीर वगैरे)</u>

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून उपशम रद्द होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.१ भैराप्पा दुर्गाप्पा जावीर हे दिनांक ३०.११.२०२४ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.२ ते ८ हे अलहिदा प्रतिवादी क्र.१ यांचे वारस म्हणून अभिलेखावर आहेत. तसेच अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांचे वारस आहेत. प्रतिवादी क्र.१ यांचे मृत्युचा दाखला वादी यांना वेळेत प्राप्त न झाल्यामुळे वारस अभिलेखावर घेणेकरिता झालेला विलंब माफ करुन घेणेकरिता तात्काळ अर्ज सादर करता आला नाही. त्यामुळे, अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

२. प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी त्याच अर्जाच्या पाठीमागील बाजूस त्यांचे म्हणणे सादर करुन अर्जातील सर्व कथने अमान्य केलेली आहेत. त्यांच्या कथनानुसार, अर्जात योग्य ते कारण नमूद केलेले नाही. त्यामुळे, अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे. तसेच वैकल्पीकरित्या अर्ज मंजूर करणेचा झालेस रक्कम रुपये ५,०००/- खर्च बसविणेची विनंती केली आहे.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. वादीने त्यांच्या कथनाच्या पृष्ठयर्थ नि.७७ कडे प्रतिवादी क्र.१ भैराप्पा दुर्गाप्पा जावीर यांच्या मृत्युचे प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. सदर प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता भैराप्पा दुर्गाप्पा जावीर हे दिनांक ३०.११.२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस हे या दाव्याचे जरुरी पक्षकार झालेले आहेत. त्यामुळे, दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणारे आहे. वादीने मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेणेबाबत अर्ज देण्यास झालेल्या विलंबाबाबत समाधानकारकरित्या खुलासा केलेला नाही किवा त्यापृष्ठयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. परंतु, त्यामुळे, अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होणार नाही. वादीने मागणी केल्याप्रमाणे वारस अभिलेखावर आणणेस

झालेला विलंब माफ करणे संयुक्तिक ठरणारे आहे. वादीने प्रस्तुतचे अर्ज दिनांक २१.०६.२०२५ व दिनांक ०३.०१.२०२६ रोजी दाखल केलेले आहेत. त्यामुळे, अर्ज मंजूर करण्यापूर्वी प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब विचारात घेता, प्रतिवादी यांना एकत्रीत रक्कम रुपये २००/– खर्च देवून अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी यांना एकत्रीत रक्कम रुपये २००/– देणेच्या अटीवर प्रस्तूत अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. आपोआप झालेला उपशम आदेश रद्द करणेत येत आहे.

PRAKASH CHUNNI BACHHALE

Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.03.10 13:04:52 +0530

**(प्रकाश चु. बछले)**

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
जत.

जत.
दिनांक –०७.०३.२०२६

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | R. B. Samalewale, Grade-3 |
| Court. | : | C.J.J.D. & J.M.F.C., Jath |
| Date | : | 07.03.2026 |
| the Presiding Officer on. | : | 10.03.2026 |
| Order uploaded on. | : | 10.03.2026 |